आदिवासी साहित्य : संकल्पना, स्वरूप व वाटचाल

संपादक :
प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे
डॉ. पांडुरंग भोसले
डॉ. सचिन रुपनर
डॉ. पौर्णिमा कोल्हे



ISBN : 978-81-948864-6-4

आदिवासी साहित्य : संकल्पना, स्वरुप व वाटचाल
Aadivasi Sahitya : Sankalpana, Svarup Va Vatchal

संपादक : प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे, डॉ.पांडुरंग भोसले, डॉ.सचिन रुपनर, डॉ. पौर्णिमा कोल्हे

सर्व हक्क : डॉ.पांडुरंग भोसले

भ्रमणध्वनी : ९४२०९७७८२२, ९४२३२५५०३८
ई-मेल : sachinrupnar@gmail.com

प्रकाशक :

सौ.सोनी अहिरे – मोरे

आविष्कार प्रकाशन,
सोमाटणे, तळेगाव दाभाडे, पुणे-४१२१०६
भ्रमणध्वनी : ९९६०१६९९७४, ८३९००४७१७४
ई-मेल : aavishkarprakashan@gmail.com

अक्षरजुळणी/मुद्रक :
श्री. मनोज घोडके, श्री. दीपक मोरे
भ्रमणध्वनी : ८३९००४७१७४, ९९६०१६९९७४

मुखपृष्ठ : श्रीराम रसाळ

प्रथमावृत्ती : ५ सप्टेंबर २०२१

मूल्य : रू. ४९०/-

---

* या पुस्तकात समाविष्ट असलेल्या लेखातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

आदिवासी साहित्य : संकल्पना, स्वरूप व वाटचाल
ग्रंथासंबंधी थोडेसे....

१९७० नंतर मराठी साहित्यात खऱ्या अर्थाने परिवर्तनाला प्रारंभ झाला. त्याची दोन कारणे होती. एक म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळून वीस वर्षांपेक्षा अधिक काळ उलटून गेला होता. नुसते स्वातंत्र्य मिळाले, असे नाही. तर जाती धर्मनिरपेक्ष मूल्यांचा स्वीकार करणारी भारतीय राज्यघटनाही स्वीकारली गेलेली होती. या दोन महत्त्वाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्यानंतर जन्मलेली पिढी स्वातंत्र्याचा, समतेचा, बंधुतेचा आणि सर्वधर्मसमभावाचा शोध घेत होती. स्वातंत्र्यानंतर जन्मलेल्या पिढीला आपल्या भोवती उपरोक्त मूल्यांचा फारसा स्वीकार होताना दिसत नव्हता. एक प्रकारे नैराश्यच त्यांच्या वाट्याला येत होते. परिणामी साऱ्याच जाणिवा तो पोटतिडकीने मांडू लागला. आपल्या जाणिवांच्या अभिव्यक्तीसाठी म. फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारातून प्रेरणा घेऊ लागला. त्यातूनच त्याचे साहित्याचे स्वरूप बदलत गेले. प्रस्थापित साहित्य संकल्पनांना या साहित्याने हादरे द्यावयास प्रारंभ केला.

दुसरी गोष्ट म्हणजे समाजातील या विपरीत परिस्थितीच्या विरोधात विविध सामाजिक चळवळी उदयाला आल्या. या चळवळींनी भोवतीच्या समाजाचे प्रश्न मुखर करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी तीव्र सामाजिक लढे या चळवळींनी उभारले. 'युवक क्रांती दल' आणि 'दलित पँथर' या दोन या कालखंडातील महत्त्वाच्या चळवळी होत. या चळवळींच्या पाठोपाठ शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेची चळवळ सुरु झाली. शेती मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे म्हणून मोठे लढे उभारले गेले. भारतीय पातळीवरही शेती प्रश्नासंबंधी कोठे-कोठे लढे चालूच होते. शरद जोशी यांचे सर्व विचार आपल्याला पटतील असे नाही. कारण ते अंतिमत: उजव्या विचारसरणीकडे वळले. असे असले तरी भारतीय शेती आणि शेतकरी यांचे प्रश्न त्यांनी पुन्हा एकदा ऐरणीवर आणले, यात मात्र शंका नाही. परिणामत: १९७० नंतर दलित साहित्याच्या चळवळीने मराठीत जोर धरला. किंबहुना दलित पँथरची चळवळ आणि दलित साहित्याची चळवळ परस्परांच्या हातात हात घालून चालू लागल्या. या दोन्ही

बकरीचे केस व पिसे लावून सजवितात. तसेच मण्याच्या माळा, हस्तिदंत किंवा लाकडी कडी इत्यादी दागिने अंगावर घालतात. निरनिराळ्या रंगाची भडक कपडे किंवा काळ्या रंगाचे वस्त्र कंबरेभोवती गुंडाळतात.

नागा लोकांमध्ये प्रत्येक गावाचा कारभार स्वतंत्रपणे चालतो. प्रत्येक जमातीचे मंडळ असते. हंगामी, लोथा, रेंगमा वगैरे जमातीच्या ग्राम संस्थेत गावातील सर्वच वयस्क भाग घेतात.

नागा लोकांचे नवीन वर्ष मे महिन्यामध्ये सुरू होते. वर्षाचा शुभारंभ 'मोत्सू' नृत्याने करतात. त्या वेळी गावाची साफसफाई केली जाते. नृत्यवेश, अलंकार व आयुधे स्वच्छ करतात. या उत्सवात तरुण-तरुणी खूप मद्यपान व बेहोषपणे नाचतात. या उत्सवात स्वैर वर्तनाला मुभा असते. भाताची कापणी झाल्यानंतर 'पोकपटूगी' उत्सव साजरा करतात. विशिष्ट खेळ खेळतात. एकंदरीतच नागा जमातीचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे प्रत्ययाला येते.

संदर्भग्रंथ :

१. खतीब, के.ए., ''मानवी भूगोल'', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००६.

२. सवदी, ए.बी., कोळेकर, पी.एस., ''मानवी साधन संपत्ती भूगोल'', निराली प्रकाशन, पुणे, २००९.

३. सावंत, (डॉ.) प्रकाश, ''मानवी भूगोल'', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००९.

***

५१.

डॉ. कुंडलिक केदारी यांची मुलाखत

(थोर नाटककार, रंगकर्मी, दिग्दर्शक, कथाकार, नाट्य कलावंत, चित्रपट दिग्दर्शक, एकांकिकाकार)

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर अंबादास वाल्हेकर, घोडेगाव, जि. पुणे.

प्र.१. आपले शालेय, विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण कोठे झाले?

उत्तर – माझे प्राथमिक शिक्षण – १ ते ७ वी पर्यंतचे जीवन शिक्षण मंदिर निमगिरी, ता. जुन्नर जि. पुणे येथे झाले (आजोळी). विद्यालयीन शिक्षण जुन्नर, जि. पुणे येथे ८ वी ते ११ वी पर्यंत अण्णासाहेब आवटे विद्यालय, जुन्नर, जि. पुणे येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथे मार्डन कॉलेज, शिवाजीनगर, पुणे व एस.पी. कॉलेज, पुणे येथे झाले. नोकरी करीत शिक्षण केले.

प्र.२. साहित्यनिर्मितीचे संस्कार कसे झाले?

उत्तर – माझा मुळचा पिंड कलावंताचा. प्राथमिक शाळेपासून कॉलेज पर्यंत सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होण्याची इच्छा होती, परंतु तशी काही चांगली संधी मिळाली नाही. त्यामुळे मी नेहमी अस्वस्थ असायचो. नोकरी निमित्त मी खेड्यातून (मूळगाव खैरे, ता. जुन्नर, जि. पुणे) पुणे शहरात आलो. महाविद्यालयीन शिक्षण नोकरी करत पुण्यात झाले. या काळात माझे वास्तव्य डॉ. गोविंद गारे (मामा) यांचेकडे होते. त्यांचेकडे अनेक विद्वान लोकांची उठबस असे. त्यांच्या निरनिराळ्या विषयावरील गप्पा मला आवडत. तो माझा छंदही होता. त्यांचा प्रभाव माझ्यावर पडला. लेखनाची सुरूवात मी कवितेने केली. मनातील भावना कमी शब्दात व्यक्त करण्याचे हे एक माध्यम. 'सुगावा' मासिकाने माझी पहिली कविता प्रसिद्ध केली आणि लेखनाला सुरूवात झाली. मी अनेक कथा, लेख लिहिले आणि ते प्रसिद्ध झाले.

प्र.३. आदिवासी जीवनातील एकांकिका, नाटक व दिग्दर्शनाकडे आपण कसे वळालात?

उत्तर – नोकरी सांभाळून छंद म्हणून मी ''नाट्य आभिनय व दिग्दर्शन'' प्रशिक्षण 'भरत नाट्य मंदिर' पुणे येथून पूर्ण केले. त्याच वेळी अनेक कलावंत मित्रांचा गोतावळा गोळा झाला. ह्या काळात पुणे शहरातील अनेक नाट्य संस्थांकडे उमेदवारी करण्याचा प्रयत्न केला, परंतु मला कुठेही संधी मिळाली नाही. आतला आवाज काही स्वस्थ बसू देत नव्हता. मी मनाचा निश्चय केला आणि स्वलिखित एकांकिका 'छळ' एका एकांकिका स्पर्धेत सादर केली. विषय होता सरकारी कार्यालयात 'आदिवासी कर्मचाऱ्यांचा होणारा छळ' पुणेरी रंगभूमीवर हा विषय सर्वांना भावला आणि खऱ्या अर्थाने आदिवासी रंगकर्मी म्हणून माझी आणि आदिवासी रंगभूमीची पुणे येथे मुहूर्तमेढ रोवली.

प्र.४. आपल्यापूर्वी आदिवासींच्या जीवनावर कोणी नाट्यलेखन व नाट्यदिग्दर्शन केले आहे काय?

उत्तर – आदिवासी जीवनावर नाट्यलेखन, दिग्दर्शन आणि सादरीकरण यापूर्वी पुणे येथे केल्याचे मला माहित नाही किंवा आजपर्यंत माझ्या वास्तव्यात लक्षात आले नाही. माझ्या आठवणीप्रमाणे १९६० ते १९७० च्या काळात आदिवासी वाड्यावस्त्यावर पौराणिक नाटकांचे कार्यक्रम होत असत. गावातील संत परंपरेतील लोक अशी नाटके जत्रा, यात्रेतून सादर करीत असत. ही नाटके मौखिक असत त्यामुळे त्यांच्या नाट्यसंहिता पहायला मिळत नाहीत.

प्र.५. आपल्या नाट्यनिर्मितीचे प्रयोजन काय ?

उत्तर – प्रत्येक रंगकर्मीला आपल्या 'नाट्यकृती'चे प्रदर्शन व्हावे ही इच्छा असतेच. त्यासाठीच तर निर्मिती केलेली असते. आदिवासी अस्मिता पुणे शहरात जपावी, आदिवासी समाजाला जागृत करावे आणि सजग ठेवावे या उद्देशाने पुणे शहरात आदिवासी रंगभूमीचे कार्य सुरू केले. परंतु 'आदिवासी रंगभूमी' चळवळ म्हणून उभी राहिली नाही. सुरूवातीला मी तसा प्रयत्न केला परंतु आदिवासी समाजाने त्याकडे ढुंकूनही पाहिले नाही आणि मी नाद सोडला. पुणेकर रसिकांना आदिवासी संस्कृतीची गुणवैशिष्ट्ये समजावीत म्हणून मी नाट्य, चित्रपट, लघुपट माध्यमांचा उपयोग करून सजग ठेवण्याचा प्रयत्न करतो आहे.

प्र.६. आपल्या नाट्यनिर्मितीच्या प्रेरणा कोणत्या आहेत?

उत्तर – नाट्यनिर्मितीची प्रेरणा मला 'दलित रंगभूमी'कडून मिळाली

आहे. १९७० ते १९८० च्या दशकात दलित रंगभूमीची चळवळ जोरात होती. त्याकाळात मी पुण्यात होतो. त्यामुळे आदिवासी म्हणून 'दलित रंगभूमी' जवळची वाटली. त्यामधील रंगकर्मींनी मला मार्गदर्शन व सहकार्य केले. नाटकातील पहिले गुरू भि.शि. शिंदे (आबा) यांच्या प्रेरणेने मी नाट्यक्षेत्राकडे वळलो. दुसरे गुरू जयंतकुमार त्रिभुवन ह्यांचे मला फार मोठे सहकार्य मिळाले. त्यानंतर 'वगनाट्य' प्रकारातले गुरू म्हणून मला ढमढेरे, नारायण कांबळे यांचा उल्लेख करावा लागेल.

प्र.७. मराठी नाटक व मराठी रंगभूमीच्या समृद्ध परंपरेने आदिवासींच्या जीवनाकडे दुर्लक्ष केले असे आपणास वाटते का?

उत्तर –'मराठी रंगभूमीवर' 'आदिवासी' विषयाला आजही वाव नाही. प्रख्यात नाटककारांनी आदिवासींवर नाटके लिहिली नाहित. प्रायोगिक रंगभूमीवर बोटावर मोजण्याइतकी नाटके आली. परंतु वेगळा विषय हवा म्हणूनच त्यांची निर्मिती होती. व्यावसायिक रंगभूमीवर आदिवासी विषयावरील एकही नाट्यकृती झाली नाही. आदिवासींकडे मराठी रंगभूमीने पहिल्यापासून पाठ फिरवली आहे. दुर्लक्ष केले आहे.

प्र.८. नाटक हे मनोरंजनाचे साधन आहे, की वैचारिक व मानसिक परिवर्तनाचे साधन आहे, याबाबत आपले मत काय?

उत्तर – नाटक हे जीवनाचे अविभाज्य अंग आहे. जीवनातील जडण घडण नाटकांतून नेहमीच प्रतिबिंबीत होते. नाटक हे मनोरंजनाबरोबर वैचारिक परिवर्तन करणारे साधन आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात नाटकांचा जनजागृतीसाठी उपयोग झाला आहे. अनेक नाटकांमधून सामाजिक व्यंगावर प्रकाश टाकला आहे. 'वगनाट्य' हे तर सामाजिक प्रहसनाचे उत्तम उदाहरण आहे.

प्र.९. आदिवासी नाट्यनिर्मिती अत्यल्प असल्याची कारणे काय?

उत्तर – आदिवासी समाज डोंगरदऱ्यात विखुरला आहे. अजूनही प्राथमिक गरजासुद्धा पुऱ्या होऊ शकल्या नाहीत. तेथे नाटकांची थिएटरे कशी पोहचणार. जत्रेमधील खेळातून मनोरंजन करणारी ही माणसं पुणे, मुंबई शहरात वास्तव्याला असलेली आदिवासी माणसे प्रामुख्याने उपनगरात राहणारी आहेत. थिएटरे ही मध्यवर्ती उच्चभ्रू वस्तीत असल्यामुळे तेथे आदिवासींचा वावर नाही. नाट्यकला ही उच्चभ्रू आणि प्रतिष्ठित समाजाची समजली जाते, तसेच त्याचे तिकिट दर

त्यांच्याच खिशाला परवडणारे असल्यामुळे शहरातील आदिवासींचा नाटक पहाण्याचा कल नाही. रंगभूमीवर आदिवासी विषय हाताळले गेले नसल्यामुळे 'नाटक' हे आदिवासींना जवळचे वाटले नाही. 'आदिवासी रंगभूमी' म्हणून महाराष्ट्रात अस्तित्त्वात आली नाही. चळवळीचे माध्यम म्हणूनही तिचा उपयोग झाला नाही.

प्र.१०. आदिवासी नाट्यनिर्मितीत लक्षणीय वाढ होण्यासाठी उपाय काय?

उत्तर – नाटक हे टिम वर्क आहे. नाट्यलेखन झाले म्हणजे संपले असे होत नाही. नाटक प्रेक्षकांपुढे सादर करेपर्यंत त्याचा प्रवास सुरू असतो. याला नाटकाचा प्रयोग असे म्हणतात, त्यामध्ये वारंवार बदल घडवून आणावे लागतात. प्रत्येक प्रयोग हा वेगळा होतो. प्रायोगिक किंवा व्यावसायिक आदिवासी नाट्यसंस्थांची वाढ व्हायला पाहिजे. आदिवासी रंगभूमीने प्रथम स्वत:चा असा प्रेक्षकवर्ग निर्माण केला पाहिजे. नाट्यपरिसंवाद आयोजित करून सामाजिक जाणीव निर्माण करायला हवी. आदिवासींचे वेगळेपण रंगमंचावर आल्याशिवाय सामान्य प्रेक्षकवर्गाची पसंती मिळणार नाही. आदिवासी रंगभूमी ही चळवळ म्हणून उभी राहत नाही तोपर्यंत आदिवासी नाट्यनिर्मितीत लक्षणीय वाढ होणार नाही.

प्र.११. आदिवासी नाटक व आदिवासी रंगभूमी ही अभिजनांच्या रंगभूमीपेक्षा वेगळी आहे काय?

उत्तर – 'आदिवासी' विषयावर लिहिलेले, बेतलेले नाटक म्हणजे आदिवासी नाटक होय. ही नाटके आदिवासी लेखकांनी लिहिलेली किंवा आदिवासीतर लेखकांनी लिहिलेली होय.

आदिवासी रंगभूमी म्हणून वेगळी अशी रंगभूमी महाराष्ट्रात तरी अस्तित्त्वात नाही. त्यामध्ये सातत्य दिसून येत नाही. एखादे दुसरे नाटक रंगभूमीवर येणे ह्याला आदिवासी रंगभूमीवरील नाटक म्हणून कोणी मानलं नाही. 'चळवळ' म्हणून आदिवासी समाजानेसुद्धा त्याकडे लक्ष दिले नाही. नाटक हे खेड्यापाड्यात पोहचले नाही किंवा तेथे थिएटरचीसुद्धा सोय नाही. त्यामुळे ते रूजू शकले नाही. अभिजात रंगभूमी किंवा प्रस्थापित रंगभूमी (पुणे, मुंबई, सांगली) च्या जाणिवा पूर्ण वेगळ्या आहेत, त्यांचा प्रेक्षक वेगळा आहे. आदिवासींच्या

जाणिवा वेगळ्या आहेत. त्यांना त्यांच्या वस्तीत करमणूक करणारे खेळ, तमाशे हेच जवळचे वाटतात आणि ते ते पसंत करतात.

प्र.१२. आदिवासी नाटक व आदिवासी रंगभूमी आणि आदिवासी साहित्य चळवळ यांचा परस्पर संबंध आहे काय?

उत्तर – आदिवासी नाटक आणि आदिवासी रंगभूमी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. परंतु आदिवासी रंगभूमी आणि आदिवासी साहित्यिक चळवळ यांचा दुरान्वये संबंध आहे. आम्ही केलेल्या नाटकांचे पुणे शहराबाहेर प्रयोग झाले नाही. त्यामुळे ते सर्वसामान्य प्रेक्षकांपुढे आले नाहीत. आम्ही आदिवासी रंगभूमीवर तोकडे प्रयोग केले. ते सामान्य अस्तित्त्वासाठी, आदिवासी अस्मिता टिकविण्यासाठी त्याला अजून प्रेक्षकांनी मान्यता दिली नाही.

आदिवासी रंगभूमी आणि आदिवासी साहित्य चळवळ याचा दुरान्वये संबंध आहे. आदिवासी नाटकांची 'साहित्य' म्हणून आदिवासी साहित्यिकांनी जरूर दखल घेतली आहे. परंतु आदिवासी रंगभूमीसाठी आदिवासी साहित्यिकांनी खास काही प्रयत्न केले नाहीत. 'नाटक' वाचण्यासाठी घेणारा प्रेक्षक नाहीत. 'नाटक' वाचण्यासाठी घेणारा प्रेक्षक आजही शोधून सापडत नाही. त्यामुळे नाटकांची पुस्तके फार कमी प्रकाशित झाली.

प्र.१३. आदिवासी नाटक नवशिक्षित आदिवासींकडून सशक्तपणे का लिहिले जात नाही?

उत्तर – नाटक ही रंगमंचीय 'कला' आहे. तसेच ते टिम वर्क आहे. दुसरे असे की, नाट्यांगांचा अभ्यास असल्याशिवाय नाटक लिहू शकत नाही. नाटक सादर करणारी संस्था तयार असली तरच नाटक लिहिले जाते. नवशिक्षित आदिवासीचे मुख्य लक्ष 'उदरनिर्वाह' हेच होते आणि आजही आहे. त्यामुळे नाट्यशास्त्र शिकण्याकडे त्यांचा कल नव्हता, आजही नाही. पुणे शहरात आदिवासी नाट्यकलावंतांचे प्रमाण अत्यल्प आहे. प्रत्येक कलावंतांमध्ये विशेष प्रकारची प्रतिभा असते. परंतु ती जोपासली नाही तर समाजाला कळत नाही. नवशिक्षित आदिवासींमध्ये नाटककार अत्यल्प आहेत, त्यामुळे 'सशक्त नाटक' दर्जेदार नाटक लिहिले गेले असले तरी सादरकर्त्या संस्था नसल्यामुळे सामान्य प्रेक्षकांपुढे ते येत नाही.

प्र.१४. आपण नोकरी करत असताना रंगकर्मी, नाटककार, दिग्दर्शन

नाट्य प्रशिक्षक, चित्रपटकार, संहितालेखक, कथाकार, एकांकिकाकार इ. विविध भूमिका करण्याचे बळ आपणास कसे मिळाले?

उत्तर – असेल आवड तर मिळेल सवड! मी स्वत:ला 'रंगकर्मी' समजतो आणि 'रंगकर्मी' म्हणून जगतो. कलावंत म्हणून स्वत:च्या कलेचे प्रदर्शन करण्याचा मी फार प्रयत्न करीत होतो. परंतु संधी काही कुठे मिळत नव्हती. त्यामुळे माझ्यातला कलावंत अधिक अस्वस्थ होत होता. हे अवस्थ मन मोकळे करण्यासाठी मी लेखणी उचलली आणि जे सुचलं, लिहावेसे वाटले ते लिहित गेलो. ह्याच अस्वस्थपणातून मी अनेक कथा लिहिल्या आणि 'अस्वस्थ मी' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. रंगभूमीची सुरूवात मी एकांकिका लेखन व सादरीकरणाने केली. 'छळ', 'विरह' या एकांकिकांचे लेखन करून स्पर्धेत सादर केल्या, त्या पसंतीस आल्या, साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदानाने प्रसिद्ध झाल्या. जीवनाला कलाटणी मिळाली. त्याचवेळी रंगभूमीला वाहून घेण्याचे निश्चित केले. खात्याच्या परीक्षा देऊन बढत्या मिळविण्याच्या फंदात कधी पडलो नाही. पोटापूरता पगार मिळत होता आणि त्यामध्ये कुटुंबियासोबत सुखाने राहाता येत होते. मी पैशाची हाव धरली नाही. कलेची आस बाळगली आणि निर्मिती, चित्रपट, कथा, लघुपट सर्वांना आपल्या अनुभवाचा फायदा मिळावा या हेतूने दोन संकेतस्थळं खुली केली आहे.

प्र.१५. आपल्या नाट्य करिअरच्या काळातील पुणे शहर आणि तेथील सामाजिक व सांस्कृतिक वातावरण कसे होते. आपणास ते अनुकूल होते का?

उत्तर – मी पुण्यात १९७८ ला दाखल झालो तेव्हाचं पुणे म्हणजे साहित्यिकांचे पुणे, कलावंतांचे पुणे, समाजसेवकांचे पुणे होते. वातावरण छान होते. परंतु 'आदिवासी' कलावंत म्हणून मला कोणीही जवळ करीत नव्हते. मी स्वत:हून निरनिराळ्या संस्थेत जायचो, परंतु आमच्या आदिवासी 'बोली'चे सर्वांनाच वावडे होते. जेव्हा पुणेरी रंगभूमीने मला चेपण्याचा, दडपण्याचा प्रयत्न केला त्यावेळी दुप्पट मी ताकद लावली, लढत राहिलो. लाखो रूपये खर्च केले. कलावंत गोळा केले आणि नाट्यनिर्मितीची सुरूवात केली. त्यानंतर चित्रपट निर्मिती. पुण्याचे एक वैशिष्ट्य कायम आहे. जरा वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण

काही केले तर त्याची दखल घेतात. प्रोत्साहन देतात, हे बाकी खरे.

प्र.१६. आदिवासी नाटक व आदिवासी रंगभूमीला उज्ज्वल भवितव्य आहे काय?

उत्तर – जोपर्यंत आदिवासी 'प्रेक्षक' तयार होत नाही. तोपर्यंत 'आदिवासी' नाटक नाही, आणि 'आदिवासी रंगभूमीला' उज्ज्वल भविष्य आहे, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. फोडणीसाठी आदिवासी समाजाचा सर्रास उपयोग केला जातो. आमची नाटकं जोपर्यंत आमचा समाज पाहत नाही तोपर्यंत आदिवासी रंगभूमीचे भविष्य अंधकारमय आहे. आदिवासी समाज शहरातसुद्धा विखुरला आहे, तो संघटीत नाही. पोटापाण्याच्या प्रश्नात आयुष्यात गुंतला आहे. त्याला नाटक कसे परवडेल. नाटक ही उच्चभ्रू समाजाची कला आणि करमणूक झाली आहे. शहरात वास्तव्य करणारे आदिवासी सिनेमा पाहतील, दारू पितील पण आदिवासी नाटकाला जातील असे नाही. आदिवासी अस्मिता टिकविण्याचे काम खेड्यापाड्यातील आदिवासी करतात. शहरीबाबुंना त्यांचे काय? माझा स्वत:चा अनुभव असा आहे की, मी फुकट नाटक पहाण्याचे विनम्र आवाहन करूनसुद्धा पुणे शहरातील सुशिक्षित आदिवासींनी नाटके पाहिली नाहीत. माझ्या नाटकांचे रौप्यमहोत्सवी प्रयोग झाले. ते केवळ चोखंदळ पुणेरी प्रेक्षकांमुळेच हे मात्र खरे आहे.

प्र.१७. आदिवासी चित्रपट, लघुपटाच्या निर्मितीकडे आपण कसे वळालात?

उत्तर – मुळात माझा पिंड कलावंताचा आहे. लहानपणापासून मला या कलेविषयी आकर्षण आहे. कथालेखन, नाटक, एकांकिका लेखन इ. मधून आदिवासी जीवनाचे चित्रण केले आहे. साहित्यातील या चित्रणाला कलेची जोड द्यावी म्हणून मी चित्रपट, लघुपटाच्या निर्मितीकडे वळलो आहे. हे माध्यम आदिवासी समाजाच्या परिवर्तन, प्रबोधन आणि जाणिवजागृतीसाठी मला महत्त्वाचे वाटले. म्हणूनच यासाठी 'बहुरंग', पुणे ही संस्था इ.स.२००६ साली पुणे शहरात स्थापन केली. आदिवासी जीवनावरील चित्रपट निर्मितीची मुहूर्तमेढ येथेच रोवली गेली आहे. या संस्थेच्या नेतृत्त्वाखाली २००६ पासून आजतागायत १४ वेळेस आदिवासी लघुचित्रपट महोत्सवाचे आयोजन पुणे येथे करण्यात आले होते. या महोत्सवाला २०१७ साली एक तप पूर्ण झाले आहे.

या महोत्सवात अनेक राज्यातून आलेल्या लघुपट, माहितीपटाचे प्रदर्शन झाले. देशात सातत्याने आदिवासी लघुचित्रपट महोत्सवाचे यशस्वी आयोजन करणारी बहुरंग, पुणे ही एकमेव संस्था ठरली आहे.

प्र.१८. आपण कोणते लघुचित्रपट दिग्दर्शित केलेले आहेत?

उत्तर – मी नक्षलवादावर पहिला लघुचित्रपट 'आत्मबोध' हा दिग्दर्शित केला आहे. त्यानंतर दुसरा लघुचित्रपट म्हणजे 'व्वा! पहिलवान' तर तिसरा आणि महत्त्वपूर्ण चित्रपट म्हणजे केंद्र सरकारच्या पेसा कायद्याची आदिवासी समाजात जाणीव जागृती व्हावी, या उद्देशाने स्वखर्चाने 'आमच्या गावात आमचेच सरकार' या चित्रपटाचे यशस्वी दिग्दर्शन केले आहे.

प्र.१९. वरील चित्रपटांबद्दल सर आपण आपले अनुभव सांगू शकाल का?

उत्तर – नक्कीच सांगेल. सर तुम्ही फार छान प्रश्न विचारला. या प्रश्नाच्या उत्तरामुळे आपला संवाद यशस्वी होतोय याचे समाधान आहे.

विशेषत: केंद्र सरकारच्या पेसा कायद्याबद्दल आदिवासी समाजात जाणीव जागृतीचा अभाव आहे. आदिवासी समाजाची या कायद्याबद्दलची समज वाढावी आणि आदिवासींच्या मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन व्हावे याच उद्देशाने वरील चित्रपटाचे मी पदरमोड खर्च करून दिग्दर्शन केले आहे. वरील चित्रपटाला शहरातून प्रेक्षक मिळाले. परंतु ज्यांच्यासाठी मी चित्रपट तयार केला त्या आदिवासी बांधवांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला नाही. ही खंत मात्र आहे. अपवादात्मक काही संस्थांच्या वतीने माझ्या चित्रपटाचे प्रदर्शन पुणे व अहमदनगर जिल्ह्याच्या आदिवासी बहुल भागात झाले. पण त्याचे प्रमाण फार तुरळक होते. तरीही मी माझे प्रयत्न सोडले नाही. याबाबत मी निराश नाही. आदिवासींच्या जाणीव-जागृतीचे माझे प्रयत्न कधी थांबणार नाही. ते अखंडपणे चालू राहणार आहे.

सर आपण मला आपली नोकरी व कलेच्या व्यवहारातील अत्यंत बहुमोल स्वरूपाचा वेळ आपल्याशी संवाद साधण्यासाठी उपलब्ध करून दिला, त्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानत आहे. यापुढील काळातील आपल्या लेखन कार्यास व कला क्षेत्रातील कार्यास आपणास हार्दिक शुभेच्छा! धन्यवाद सर.

***